प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE
CIDCO WE MAKE CITIES
सिडको शहरांचे शिल्पकार
CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
**Regd. Office:** Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
**Head Office:** CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294;
For updated information, follow us on - @cidco_ltd :/cidco YouTube CIDCO Ltd. @cidco_ltd

दि. २४.०५.२०२१

## सिडको औद्योगिक विचारविनिमयाद्वारे पालघर नवीन शहर प्रकल्प विकसित करणार

महाराष्ट्र शासनातर्फे ४४०-५७.९० हेक्टरच्या क्षेत्रात पालघर जिल्हा मुख्यालय आणि पालघर नवीन शहर प्रकल्प विकसित करण्याची जबाबदारी सिडकोवर सोपविण्यात आली आहे. नवी मुंबईसारखे आंतरराष्ट्रीय दर्जाचे शहर विकसित केलेल्या सिडकोकडून मुंबईपासून ११० कि.मी. उत्तरेकडे व पालघर आणि बोईसर शहरांच्या मधोमध, ३७७ हेक्टरवर पालघर नवीन शहर प्रकल्प विकसित करण्यात येत आहे.

सदर प्रकल्पातील १०३.५७ हेक्टर क्षेत्र हे जिल्हा मुख्यालयासाठी तर ३३७.० हेक्टर क्षेत्र हे पालघर नवीन शहरासाठी राखीव आहे. पालघर जिल्हा मुख्यालयामध्ये जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा पोलीस अधीक्षकांचे कार्यालय, जिल्हा परिषद कार्यालय, जिल्हा व सत्र न्यायालय यांच्या इमारती, नवीन प्रशासकीय इमारती, प्रेक्षागृह, शासकीय विश्रामगृह, जिल्हा मुख्यालयातील किमान १०% कर्मचारी/अधिकाऱ्यांसाठी निवासस्थाने यांचा समावेश होतो. आतापर्यंत सिडकोकडून जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय आणि जिल्हा परिषद कार्यालयाच्या इमारतींचे नियोजन, संकल्पन आणि बांधकाम करण्यात आले आहे. सिडकोकडून आता उर्वरित ३७७ हेक्टरवर पालघर नवीन शहर विकसित करण्यास सुरुवात झाली आहे. परंतु सदर प्रकल्प विकसित करण्यापूर्वी सिडकोला बाजारातील प्रचलित कल, गुंतवणूकदारांचा विश्वास व त्यांच्या आवडीची क्षेत्रे, इच्छुक खरेदीदारांच्या आकांक्षा आणि प्रस्तावित नवीन शहर हे विकासाचे यशस्वी प्रतिमान (मॉडेल) बनवण्यासाठीच्या कल्पना जाणून घेणे व्यावहारिकदृष्ट्या आवश्यक वाटत आहे.

**"सिडकोकडून पालघर नवीन शहर प्रकल्प विकसित करण्यास सुरुवात करण्यात आली असून प्रकल्प विकसित करण्यापूर्वी बाजाराच्या पैलूंचे सखोल आकलन करून घेण्याचा सिडकोचा उद्देश आहे. तसेच, आर्थिकदृष्ट्या वर्धनक्षम आणि विकासाच्या दृष्टीने शाश्वत ठरणारे नियोजन धोरण आखण्याबाबत, औद्योगिक क्षेत्रातील तज्ज्ञांकडून करण्यात येणाऱ्या मोलाच्या सूचनाही जाणून घेण्यात येतील."**

**डॉ. संजय मुखर्जी**
**उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको**

प्रस्तावित प्रकल्पाबाबत उद्योग जगताला माहिती देणे आणि औद्योगिक विचारविनिमयाद्वारे जमीन वापराचे प्राधान्य, आवश्यक क्षेत्र, विकासाचे प्रतिमान, भाडेपट्ट्याच्या अटी आणि विकास व विक्रयेता, अशा महत्त्वाच्या प्राचलांबाबत उद्योजकांच्या सूचना जाणून घेण्याचा सिडकोचा उद्देश आहे. म्हणून प्रकल्पाकरिता प्रभावी विकास धोरण आखण्यासाठी औद्योगिक क्षेत्रातील तज्ज्ञांबरोबर मोलाचा विचारविनिमय करण्याकरिता स्वारस्य अभिव्यक्ती (एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट) प्रसिद्ध करण्यात आले आहे.

पालघर नवीन शहर हे छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय/देशांतर्गत विमानतळापासून १५० कि.मी. अंतरावर आहे. सध्या डहाणू रोड, पालघर आणि पनवेल दरम्यान असणारी मेमू रेल्वे सेवा पालघर ते नवी मुंबई दरम्यानची संधानता (कनेक्टिव्हिटी) वाढवण्यासाठी उपयोगात आणण्याबाबत समन्वेषण करण्यात येईल. डहाणू येथे होऊ घातलेला वाढवण बंदर प्रकल्प हा पालघर नवीन शहरापासून तासाभराच्या अंतरावर असून या प्रकल्पामुळे या प्रदेशातील अर्थव्यवस्थेस मोठ्या प्रमाणावर चालना मिळणे अपेक्षित आहे. पश्चिम रेल्वे व राष्ट्रीय महामार्गाव्यतिरिक्त वाढवण बंदर, प्रस्तावित विरार-अलिबाग मल्टि मोडल कॉरिडॉरशी असलेल्या समीपतेमुळे पालघर नवीन शहर प्रकल्प मोठ्या प्रमाणावर सामाजिक व वाणिज्यिक विकास घडवून आणेल. तसेच या प्रकल्पामुळे इच्छुक गुंतवणूकदारांनाही मोक्याच्या ठिकाणी गुंतवणूक करण्याची संधी मिळणार आहे.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

मा. संपादक महोदय,
वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.

जनसंपर्क विभाग, सिडको